# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Marathi

## Assignment

## Session: 2021 – 2022

Page No.
Date :

नाव : कु. चेतना राजेंद्र ढामले

वर्ग : बी. ए. भाग - २ (IV sem)

विषय : मराठी (आवश्यक)

कॉलेजचे नाव : यशोदा गर्ल्स आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर.

Session - 2021 - 2022

(Dr Govind Namdeo Rautekar)
(HOD, Dept of Marathi)

Principal
Yashoda Girls Arts & Commerce College
Shah Nagar, Nagpur-18

SEAL

Assignment no. 1

SEAL

Page No.
Date :

प्र १ ला राजांनी राज्यकारभार करताना कोणकोणत्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, असे रामचंद्रपंत अमात्य 'राजकर्तव्ये' या पाठातून सांगतात ?

उत्तर :- 'आज्ञापत्र' हा रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिलेला ग्रंथ आहे. स्थापलेले राज्य चांगले चालावे, वरपासून ते अंत्यश्रेणीच्या अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाने आपापले कर्तव्य पार पाडावेत यासाठीची आचारसंहिता प्रस्तुत ग्रंथात आढळते. राजाने राज्यकारभार करताना कोणकोणत्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, याविषयी 'आज्ञापत्रात' पुढील माहिती मिळते.

राजांनी राज्यकारभार करताना पार पाडावयाच्या जबाबदाऱ्यांचे विवेचन खालील मुद्द्यांच्या आधारे करता येईल.

राजकर्तव्ये :-

राजाने पूर्वजांच्या धर्माचे आचरण करून किर्ती मिळवावी. राज्यातील मंदिरे, तीर्थक्षेत्रे व सत्पुरुषांचे मठ या ठिकाणी तेथील यात्रा व उत्सव चालतील अशी व्यवस्था करावी. वैदिक, शास्त्रज्ञ, वनवासी, तपस्वी व सत्पुरुष यांच्यावर श्रद्धा ठेवून त्यांचा योगक्षेम उत्तम प्रकारे चालवावा. त्यांचा आशीर्वाद घ्यावा. धर्माविरुद्ध असणाऱ्या नास्तिक मतांचे पारिपत्य करावे. अंध, अपंग, निराधार व दुर्बल व्यक्तींना दया दाखवून त्यांच्या आमरण उदरनिर्वाहाची व्यवस्था करावी.

सेवक :-

नाजूक महालातील नोकर राजाने विश्वासू व प्रामाणिकपणा पाहून नेमावेत. सर्व नोकरांना प्रेमाने वाग-

-वावे. नोकराच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होईल इतके वेतन त्याला दरमहा न चुकता द्यावे. एखाद्या नोकराचा वि-श्वास वाटत नसेल, संशय वाटत असेल तर त्याच्या कामात बदल करावा. त्याची अन्यत्र बदली करावी. राजां-नी जवळचे लोक पूर्ण विश्वासू व एकनिष्ठ असतील त्यांनाच नेमावे. त्यांनी गुप्त बाबी बाहेर बोलू नये, याची काळजी घ्यावी. सेवकांनी विशेष कामगिरी केली तर त्यास बक्षिसे द्यावी, पण वेतनवाढ देऊ नये. त्यामुळे बाकीचे सेवक चांगले काम करतील. सेवेत सद्‌गुणी माणसे ठेवावीत. नोकराला नेमताना त्याचा पूर्वेतिहास पहावा. गुणी नोकराला अधिक प्रेमाने वागवा-वे. खुनी व शराबी माणसाला नोकरीत नेमू नये नोकरा-ला जामीन घेऊन नेमावे. नोकर विचित्र वागू लागला तर जामीनदारास जबाबदार धरावे.

## राजाचा आचारधर्म :-

राजांनी स्वतः उत्तेजक द्रव्य घेऊ नये. जवळच्या लोकांना घेऊ देऊ नये. स्वतःजवळ नेहमी ह-त्यार बाळगावे. घोड्यावर बसणे, शस्त्र चालविणे, लढा-ईच्या संदर्भातील सर्व बाबी समजून घेणे याविषयी राजां-नी तरबेज व्हावे. त्यातील श्रमाची कामे आपण करु नये. राजांनी कमी बोलावे. सेवकांच्या दोषांची जाहीर चर्चा करु नये.

कलावंतांचे गायन-नर्तन दरबारात करु नये. या गोष्टी राजांनी ऐकू-पाहू नयेत. गायन आणि नर्तन यांची आसक्ती मनात उत्पन्न झाली तर राजांचे

राजकार्य अंतरते. कवी-कलावंत यांना राजाश्रय द्यावा. विनोदात मर्यादा राहत नाही, म्हणून राजांनी विनोदी वृत्ती सोडून द्यावी.

आपण शहाणे असे न समजता राज्यकारभार करताना जेष्ठ कारभारी जनांच्या सल्ला घ्यावा. राज्यकारभारातील बुद्धिवंतांचा सल्ला घ्यावा. राजांनी राज्याच्या बाबतीत अल्पसंतुष्ट राहू नये. शत्रूमुळे राज्यावर संकट आले तर त्याचे पारिपत्य करण्याची धमक राजाकडे असावी. मिळविलेल्या राज्याचे प्रशासन पक्के करून नवे प्रदेश मिळवावेत. राज्याच्या जमाखर्च पाहून खजिना वाढवावा. खजिना म्हणजे राज्याचे जीवन आहे हे ध्यानात घ्यावे.

हुजरात :

हुजरात म्हणजे राजाचे खास सैन्य. देश-दुर्गाच्या संरक्षणाचे ते आदिकारण होय. ज्या राजाची हुजरात बळकट नसते, त्याची सत्ता पराधीन असते. शूर व पराक्रमी राजांनी नवीन नवीन प्रदेश मिळविण्याची जिद्द ठेवावी. हुजरातीतील नोकर शूर व प्रामाणिक असावेत. आळशी आणि व्यसनी माणसे हुजरातीत असू नयेत.

कुशल व्यक्तींची निवड

राजांनी राज्यात व किल्ल्यावर फिरताना बारकाईने चांगली माणसे शोधावीत. त्यांना प्रेमाने वाग-

वून योग्य त्या त्या ठायी त्यांना नेमावे. चौक्यांच्यावर पहारे करणारे पहारेकरी कामावर आहेत की नाहीत त्याची खात्री करून घ्यावी. कामचुकार लोकांना दटावून सांगावे. वेळप्रसंगी त्याची बदली करावी. शस्त्रास्त्र व दारूगोळा यांच्याबाबतीत बारीक लक्ष द्यावे. लढाईची नेहमीच उत्तम तयारी ठेवावी.

राजकुमारांचे शिक्षण :-

राजकुमारांनी शस्त्राभ्यास व लेखनाभ्यास कठोरपणे करावा. राजकुमारास शिकविण्यासाठी गुणी व प्रवीण व्यक्ती ठेवाव्यात. राजाने गुणवंत असावे विद्वान माणसांना आदराने वागवावे. राजे अनेक लोकांच्या आधार असतात. नोकरांत दोष असतात, तरीही त्यांना प्रेमाने वागवावे. त्यांचे दोष जातील असे पहावे. त्यांच्याकडून एकनिष्ठतेची सेवा नेहमी घेता आली पाहिजे.

अशा तऱ्हेने राजांनी हुजरात आणि खजिना यांच्या बाबतीत पूर्ण सावधगिरी बाळगावी. या दोन्ही बाबी सज्ज ठेवाव्यात. राजांनी नोकरांना प्रेमळपणे वागवावे. राजपुत्रांना चांगले शिक्षण द्यावे. स्वतः शौर्य गाजवावे. शस्त्रास्त्रे, युद्धसामग्री यांच्या बाबतीत राजांनी जागरूक रहावे. असलेले राज्य जतन करावे व नवे राज्य मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. प्रजेला मायेने वागवावे. प्रजेचे रक्षण करावे. राजांनी सहिष्णू, परोपकारी, उदार व हरहुन्नरी असावे. राजांनी राजसत्तेचा गर्व न करता नम्रपणे प्रजेचे कल्याण करावे. राज्या-

-तील प्रजा शांततेने व सामंजस्याने राहील, इकडे राजांनी लक्ष द्यावे. राज्यकारभारात नेमलेल्या व्यक्तीचे पद, हुद्दा व काम लक्षात घेऊन त्यांना मानाने वागवावे. राजांनी अपकीर्तीचे भय बाळगावे. राज्यातील तीर्थक्षेत्रे, मंदिरे व मठ अशा धार्मिक स्थळांतील पूजाअर्चा व उत्सव चांगले चालतील, अशी त्यांची व्यवस्था करावी. अंध, अपंग, अनाथ व दुर्बल लोकांच्या जीवनोपाय त्यांच्या मृत्यूपर्यंत चालवावा. राजांनी स्वसंरक्षणार्थ सतत शस्त्र बाळगावे. नोकर व सैनिक विश्वासू व प्रामाणिक असावेत. त्यांचा पूर्वेतिहास पाहून त्यांना नोकरीत नेमावे. त्यांना दरमहा पुरेसे वेतन द्यावे.

प्र. ३२ स्वराज्य आणि सुराज्य म्हणजे काय? ते स्पष्ट करा.

किंवा

"स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही" अशाप्रकारच्या इंग्रजी मुत्सद्द्याने बोललेल्या विधानाचा आढावा घ्या.

किंवा

स्वराज्य आणि सुराज्य या दोन संज्ञांना कशाप्रकारे मानवी जीवनात अर्थ प्राप्त झाला? याची 'स्वराज्य आणि सुराज्य' या लेखाद्वारे चर्चा करा.

किंवा

"स्वराज्य आणि सुराज्य हे एकाच नाण्याचे दोन पैलू आहेत", सविस्तर लिहा.

उत्तर :- स्वराज्य आणि सुराज्य हा लोकमान्य टिळकांचा महत्त्वपूर्ण अग्रलेख आहे. मनात उद्भवणारे विचार आणि मुखावाटे निघणारे उद्गार यांच्यामधील संबंध नित्य वा अ-

-नित्य असला तरी मात्र एक गोष्ट खरी आहे की, विचार अर्थवट किंवा अस्पष्ट असले म्हणजे त्या विचारांचे द्यो-तक जे शब्द तोंडातून निघतात तेही अस्पष्ट किंवा संदि-ग्ध असते. ज्याच्या भाषणात किंवा शब्दात गोंधळ आहे, त्यांच्या विचारातही गोंधळ असतोच. वाणी आणि अर्थ यांचा हा संबंध फार महत्वाचा आहे.

शिकलेले लोकही आपल्या विचारांमधली असंबद्धता, अस्पष्टता शब्दवडंबरात दडपून टाकण्याच्या प्रयत्न करतात. आपणास काय हवे याविषयी निश्चया-त्मक कल्पना मनात असली म्हणजे मुखावाटे किंवा लेख-णीवाटे निघणारे शब्दही तसेच निश्चयार्थक निघतात. कारण मनामध्ये विचार चालतो तो शब्दांनीच. एखादा शब्द किंवा वाक्य आपण वाचले किंवा ऐकले असता का-ही कारणांमुळे ते मनात भरते. परंतु त्याच्या अर्थाची शहानिशा झाली नसल्याने त्या शब्दाच्या रूढ अर्थाब-रोबर इतर जे आनुषंगिक अर्थ असतात, तेही मनात वा-क्याच्या किंवा शब्दाच्या अर्थाबद्दल एकप्रकारची भ्रा-मक बुद्धी उत्पन्न होते. अशा तऱ्हेने उत्पन्न झालेल्या अर्थाच्या संदिग्धतेमुळे त्याबद्दलच्या विचारसरणीत तोच दोष उत्पन्न होत असतो. त्यानुसार 'स्वराज्य' आणि 'सुराज्य' या शब्दांची व्याख्या करावयाची आहे.

काँग्रेसमध्ये दादाभाई नौरोजी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्वराज्य आणि सुराज्य हे दोन्ही शब्द वापरले आहेत. तेव्हापासून स्वराज्याची प्राप्ती करून घेणे हा राजकीय चळवळीचा अंतिम हेतू, असे सर्व लोक बोलू लागले. दादाभाई नौरोजी यांनी "स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही" अशा

अर्थाचे एक प्रसिद्ध इंग्रजी मुत्सद्याचे वचनही भाषणाच्या आरंभी घातले. त्यांच्या बोलण्याचा आशय असा - "'सुराज्याने' आमची राजकीय उत्कर्षाची इच्छा नष्ट होत नाही, तर आम्हांस 'स्वराज्य' पाहिजे." स्वराज्य कसे मिळवायचे हा एक स्वतंत्र प्रश्न आहे, त्यापूर्वी 'स्वराज्य' म्हणजे काय?

बऱ्हाणपूर येथे भरलेल्या बंगालच्या प्रांतिक सभेत बाबू सुरेंद्रनाथ, बाबू बिपिनचंद्र पॉल वगैरे मोठमोठ्या मंडळीत या संबंधाने मतभेद झाले. यावरून या शब्दाच्या अर्थाची फोड करणे आवश्यक आहे. 'स्वराज्य' म्हटले म्हणजे अनेक तऱ्हेच्या कल्पना मनामध्ये उभ्या राहतात. 'स्वराज्य' व 'स्वाराज्य' या शब्दांचा वैदिक मंत्रातही उपयोग केलेला आढळतो. 'स्वराज्य' शब्दातील 'स्व' शब्दाने सकलदर्शनी आपलेपणाचा बोध होतो. सामान्य माणसास 'स्वराज्य' म्हणजे काय? विचारले, तर तो उत्तर देईल की, 'यात काय आहे? स्वराज्य म्हणजे आपले राज्य.' परंतु या उत्तराने मनुष्याचे समाधान होणार नाही. आपले राज्य म्हणजे काय? असा प्रश्न पडतो. आपले राज्य म्हणजे आपल्या जातीचे, आपल्यातील सरदारांचे, आपल्या धर्मीयांचे किंवा आपल्या सर्व प्रजेचे अथवा आपल्या देशात धर्मात उत्पन्न झालेल्या राजांचे असे विविध प्रश्न 'आपला' या शब्दाच्या अर्थाचा विचार करतांना उद्भवतात.

ज्यावेळी प्रजा आणि राजा दोन्हीही एकाच धर्मातले, एकाच देशातले, एकाच जातीचे आणि एकाच प्रकारच्या हिताहित संबंध असणारे, राजा प्रजेच्या हितावि-

-षयी नेहमी तत्पर व दक्ष असतो तेव्हा प्रजेस आपल्यावरील राज्य स्वराज्यच आहे असे वाटते. "रामराज्य" हे अशाच प्रकारचे स्वराज्य होते.

राजे लोक प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करू लागले किंवा जुलमी झाले म्हणजे स्वधर्मातील किंवा स्वदेशातील राजा असतानाही त्यांचे राज्य लोकास नकोसे होते. पेशवाईच्या अखेरची स्थिती अशीच असल्याने बाजीरावांचे राज्य जाऊन इंग्रजांचे राज्य झाले. पण त्यांचा राज्यकारभार अव्यवस्थित असल्यामुळे ते राज्य सुखकारक नव्हते.

"स्वराज्य" या शब्दाचा अर्थ दोन प्रकारे घेता येतो. एक 'सुव्यवस्थित राज्य' आणि दुसरा 'सुखकारक राज्य'. दुसऱ्या अर्थाने पेशवाईच्या अखेरीस स्वदेशी बाजीरावाचे राज्य 'स्वराज्य' नव्हते असे म्हणता येईल. 'स्वराज्य' याविषयी दुसरेही उदाहरण आहे. राजा स्वदेशी असून आपल्या धर्माचा आहे व त्याची राज्यव्यवस्थाही शिस्तवार किंवा सुरळीतपणाची आहे. यासाठी रशियातील राज्यपद्धती उदाहरणादाखल घेता येईल.

रशियाचे झार रशियन लोकास धर्माने किंवा जातीने परके नाहीत. त्यांच्या हाताखालील प्रजेची सांपत्तिक स्थिती सुधारून ती प्रजा भरभराटीस यावी आणि देशात अधिकाधिक पैसा येऊन तो कायमचा लोकांत रहावा अशी त्यांची इच्छा आहे. परंतु झारसाहेब आपल्या प्रजेला जितके स्वातंत्र्य द्यावयास पाहिजे तितके देत नसल्यामुळे किंवा राज्यकारभारात त्यांची सल्लामसलत घेत नसल्यामुळे त्यांचे राज्य प्रजेस सुखकारक वाटत

नाही.

एका अर्थाने रशियात "स्वराज्य" म्हणजे स्वदेशी राजाचे राज्य आहे व ते शिस्तवारीच्या दृष्टीने बघितले तर "सुराज्य" आहे. पण लोकास सुखकारक राज्य अशा अर्थाने पाहिले तर सुराज्य नाही. "स्वराज्य" आणि "सुराज्य" या शब्दांचा उपयोग करताना त्यांच्या अर्थाची छाननी करणे किती जरूरी आहे, हे यावरून लक्षात येईल.

एका अर्थाने रशियातील झारसाहेबांचे राज्य स्वराज्य आहे आणि सुराज्यही आहे. म्हणजे ते स्वदेशी राजाचे राज्य आहे व तेथील राज्यकारभारही सुरळीत चालतो. पण हे राज्य प्रजेच्या मताप्रमाणे चालत नाही. स्वराज्य या शब्दाचा अर्थ 'स्व' म्हणजे प्रजा यांच्या मनाप्रमाणे चालणारे राज्य असा जर केला तर रशियातील राज्य सुराज्य असले तरी स्वराज्य नाही, असेच म्हणावे लागेल. रशियातील प्रजाजन जी चळवळ करतात ती स्वराज्याची प्राप्ती व्हावी यासाठी. राज्यपद्धत लोकतंत्राने होत नसल्याने आपण स्वराज्यी आहोत, असे प्रजेस वाटत नाही. ज्या राज्याचा कारभार प्रजेच्या किंवा प्रजापक्षाच्या तंत्राने चालतो तेच खरे स्वराज्य होय.

स्वराज्य व सुराज्य या संदर्भात दुसरे उदाहरण जर्मनीचे घेता येईल. जर्मनीत सोशियालिस्ट लोकांची जी चळवळ सुरू होती, तिचे समर्थन याच तत्वावर केले जाते. जर्मन बादशहा जर्मनीत काही परके नव्हते. जर्मन राष्ट्राचा व्यापार, संपत्ती व बोज वाढावा म्हणून ते नेहमी प्रयत्न करीत असे. त्यांच्या प्रजेपैकी बऱ्याच जणांस ही व्यवस्था सुखकारक वाटत नव्हती. राज्यका-

-रभार आपल्या तंत्राने चालेल अशा प्रकारची राज्यव्यवस्था करून घेण्यास ते झटत होते. इतर पुष्कळ देशातही हा प्रकार सुरु होता. जगात शिक्षणाच्या जितका अधिकाधिक फैलाव होईल त्यामानाने स्वदेशी राजा आणि सुव्यवस्थित राज्यकारभार एवढ्याने लोकांची तृप्ती होणे दुर्घट होत जाईल. इतकेच नाही तर "प्रजासत्ताक राज्याखेरीज खरे स्वराज्यच नाही" असे म्हणण्यापर्यंत लोकांची मजल जाईल. याशिवाय दुसरे राज्य सुराज्य होणे नाही असेही लोकांस वाटू लागेल. स्वराज्य आणि सुराज्य यांची ही अंतिम एकवाक्यता होय. ती होण्यापूर्वी प्रत्येकाचे जे अनेक पोटभेद आहेत, ते नेहमी डोळ्यांपुढे ठेवणे आवश्यक असते. सुराज्य म्हणजे नुसते सुरळीत किंवा कायद्याने, शिस्तीने, नियमाने चाललेले राज्य असा अर्थ घेतला तर इंग्रज सरकारचे हिंदुस्थानात असलेले राज्य सुराज्य होते. इंग्रज सरकारचे राज्य व्यवस्थेच्या शिस्तीच्या दृष्टीने, सुराज्य असले व ते केवळ राज्यकर्त्या गोऱ्या अधिकारीवर्गाच्या तंत्राने चालत असल्यामुळे आणि या अधिकारीवर्गास हिंदुस्थानच्या हितापेक्षा इंग्लंडचे किंवा गोऱ्या लोकांचे अधिक हित असल्यामुळे इंग्रजी राज्य सुखकारक किंवा फायदेशीर झालेले नाही. तुरुंगाची शिस्त ज्याप्रमाणे जाच देते त्याप्रमाणे इंग्रजी राज्यातील शिस्तीने, कायद्याने आणि नियमाने प्रजा, जनता चोहीकडून त्रस्त होती. देशातील व्यापारधंदे इंग्रजी व्यापाऱ्यांच्या हिताकरिता खुल्या व्यापाराचे तत्व सुरू केल्याने बुडून गेले होते. देशातील मोठमोठ्या पगाराच्या जागा नेहमीच गोऱ्या लोकांस देण्याचा नियम झाला असल्यामुळे लोकांमधील जितका

Page No.
Date :

पैसा व अनुभव दरसाल कमी होत होता आणि लष्करी खात्याच्या वगैरे अवाढव्य खर्च भागविण्यासाठी जंगल, मीठ, अबकारी वगैरे अनेक खाती काढून आणि जमिनीवरील सारे वाढवून कराच्या रुपाने अधिक द्रव्य प्रजेकडून सरकारच्या तिजोरीत जमा होत होता. अशा स्थितीत कोणतेही राज्य कितीही व्यवस्थित आणि शिस्तवार असले म्हणजे एका अर्थी सुराज्य असले तरी, लोकांस सुखकारक सुराज्य होत नाही. स्वराज्य हा शब्द यांस लागत नाही. कारण राज्यकर्ते परधर्मी, परदेशात राहणारे असल्याने त्यांचा ओढा परदेशस्थ जातबांधवांकडे असे. अशा प्रकारचे राज्य लोकांस सुखकारक होण्यास त्याचा कारभार प्रजेच्या तंत्रानेच चालला पाहिजे.

'स्वराज्याचे हक्क मिळवा' यासाठी दादाभाई नौरोजी यांनी सांगितलेला खरा अर्थ असा ~~मे~~ ते म्हणतात. हा हक्क सध्या आम्हांस मिळालेला नाही. त्यामुळे हल्लीचे राज्य सुखकारक नाही व स्वराज्यही नाही. अशा प्रकारच्या स्वराज्याकरिता केवळ खालसा मुलाखातच खटपट झाली पाहिजे. इतकेच नव्हे तर नेटिव्ह संस्थानांतूनही ही चळवळ होणे जरूरी आहे. राजा स्वदेशस्थ किंवा परदेशस्थ? या प्रश्नापेक्षा प्रजेच्या हातात सत्ता किती? हा प्रश्न अधिक महत्वाचा आहे. काही शतकापूर्वी राजनीतिशास्त्रात आणि आताच्या राजनीतिशास्त्रात मोठा भेद आहे, तो हाच होय. पुढे ते म्हणतात, वर सांगितल्याप्रमाणे खऱ्या स्वराज्याची म्हणजे ज्यातील राज्यसत्ता प्रजेच्या हातात आहे, अशाची वाण केवळ व्यवस्थित राज्याने अगर स्वदेशी राजा असला तरी भरून येत नाही. अशाप्रकारचे खरे स्वराज्य जर नाही तर व्यव-

SEAL


-स्थित सुराज्य किंवा स्वदेशी राज्य यापैकी कशानेही लोकांस सुख मिळणार नाही.

जर्मनी आणि रशिया या राष्ट्रांची उदाहरणे वर दिली आहेत. आशिया खंडातील राष्ट्रांची उदाहरणे पाहिजे असल्यास चीन, जपान, इराण ही डोळ्यांपुढे आहेत-च. सर्वत्र जी चळवळ सुरू आहे, ती प्रजेचा पगडा राज्य-कारभारावर असावा एवढ्याकरिताच होय. त्याप्रमाणे ठिक-ठिकाणी लोकांस थोडेबहुत यशही येत आहे. आम्हासही तीच गोष्ट प्राप्त करून घ्यावयाची आहे. 'स्वराज्यप्राप्ती-करिता झटो' म्हणून जेव्हा आम्ही सांगतो तेव्हा याच अर्थाने "स्वराज्य" शब्दाचा उपयोग करतो.

"स्व" म्हणजे ज्याचा तो, किंवा लोक अथवा एकंदर प्रजा आणि त्यांचे म्हणणे. त्यांच्या सल्ल्या-ने चालणारे जे राज्य ते स्वराज्य. अशास स्थितीत राजा स्वदेशी असला तरी चांगलेच, पण परदेशस्थ असला तरी फारशी हानी होत नाही. असले राज्य व्यवस्थित आणि शिस्तवार किंवा एका दृष्टीने सुराज्य असावयाचेच, पण शिस्त थोडी कमी असली म्हणून तिची किंमत स्वा-तंत्र्यापेक्षा काही अधिक ठरता येत नाही. सुराज्याने स्वराज्याची वाण भरून येत नाही असे जे म्हणतात, त्याचा अर्थ हाच होय.

'सर्वात मुख्य गोष्ट आपल्या मताप्रमाणे जे आपल्यास आपले हित वाटते, त्या धोरणाने राज्यव्य-वस्था चालविण्याचा मार्ग आपणा सर्वांस अधिकार असावा खरे स्वराज्य हेच होय. याच अर्थाने हा शब्द वापरीत अस-तो. स्वराज्य आणि सुराज्य यांचा जेव्हा विचार होतो तेव्हा त्याच्या अर्थाची फोड नेहमी लक्षात ठेवली पाहिजे.

Page No.
Date :

या अनुषंगाने 'स्वराज्य आणि सुराज्य' हा लेख महत्वा-चा आहे.

---

प्र ४ रा तुम्हांला अभ्यासक्रमाला नेमलेल्या संत चोखामेळा यांच्या अभंगांच्या आधारे तत्कालीन काळातील सामाजिक दुखणे त्यांनी मनाच्या गाभाऱ्यातून कसे विशद केले आहे?

उत्तर : संत चोखामेळा हे संत नामदेवांचे शिष्य होते. त्यांची समाधी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या महाद्वारापुढे स्थापित केली आहे. चोखोबांचे संपूर्ण कुटुंब भक्ति-प्रेमात रंगलेले असून तत्कालीन संतमंडळात त्यांना महत्वाचे स्थान मिळाले होते. 'सकलसंतवाणी' या संग्रहात चोखोबांच्या प्रक्षिप्त अभंगांसह ३००च्या वर अभंग समाविष्ट आहेत. चोखोबांची अभंगवाणी एका भक्तिप्रवण, संस्कारसंपन्न आणि संवेदनशील मनाचे मूक आक्रंदन आहे. त्यांच्या आत्मनिष्ठ काव्यात निखळ विठ्ठलभक्तीसोबतच सामाजिक उपेक्षितपणातून निर्माण झालेल्या वेदनेचा सूरही आहे.

पहिल्या अभंगात इतर वारकरी संतांप्रमाणेच पंढरपूर नगरीचे माहात्म्य चोखोबा वर्णन करतात. ते म्हणतात –

पंढरीचे सुख नाही त्रिभुवनीं।
प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे ॥१॥
त्रिभुवनीं समर्थ ऐसें पैं तीर्थ।
दक्षिण मुख वाहात चंद्रभागा ॥२॥
सकळ संतांचा मुगुटमणी देखा।
पुंडलीक सखा आहे जेथे ॥३॥

चोखा म्हणे तेथे सुखाची मिराशी।
भोळ्या भाविकांसी अखंडित ॥४॥

अशाप्रकारच्या साध्या-सोप्या ओळींम-धून चोखोबांनी पंढरीचे महात्म्य वर्णिलेले आहे. यातून भावगर्भ अशा शब्दकळेचा प्रत्यय आपल्याला आल्यावाचून राहत नाही. पुंडलीक हा आपला सखा-सोबती आहे, ही भावना येथे अभिव्यक्त झाली आहे. चंद्रभागा नदी दक्षिण मुखाने वाहत आहे. विठ्ठल हा प्रत्यक्ष चक्रपाणीच्या रूपाने दर्शन देत आहे. त्यामुळे सुखाची मिराशी येथे आपल्याला लाभते.

अभ्यासाला नेमलेला संत चोखोबांच्या दुसऱ्या अभंगातून तत्कालीन काळातील सामाजिक विषमता, त्यातून वाट्याला येणारी अन्यायकारक वागणूक 'उपजले विटाळी' या अभंगातून प्रकर्षाने दिसून येते. प्रस्तुत अभंगाच्या माध्यमातून संत चोखामेळा म्हणतात -

उपजले विटाळीं मेले ते विटाळीं।
राहिले विटाळीं तेही जाती ॥१॥
रडती पडती तेही वेगे मरती।
परि नाम न गाती भुली भ्रमें ॥२॥
कायरे हा देह सुखाचा नयासी।
उघडाचि जासी अंतकाळीं ॥३॥
चोखा म्हणे याचा न धरीं भरंवसा।
अंती यम फांसा गळा पडे ॥४॥

मानवी देह हा मुळात विटाळातच जन्मला आहे आणि विटाळातच मरणार आहे. त्यामुळे

अस्पृश्यता-विटाळ पाळू नये, असा संदेश प्रस्तुत अभंगाच्या माध्यमातून संत चोखामेळा देतात. या देहाचा भरवसा धरू नये, असे ते सांगतात. हा देह उघड्यावर आला आणि उघड्यावरच जाणार आहे. आत्मा हा नश्वर आहे. त्याचा 'भरवसा' आपण धरला पाहिजे.

तिसऱ्या अभंगातून सोवळ्या-ओवळ्याच्या रूढी-परंपरा याविषयीची व्यथा ते व्यक्त करतात. अस्पृश्य, शूद्र म्हणून ज्यांची अवहेलना झाली, अशांचे सामाजिक दुखणे मनाच्या गाभाऱ्यातून इथे चोखामेळा वेशीवर टांगताना दिसतात ते सांगतात-

कोण तो सोंवळा कोण तो ओवळा।
दोहींच्या वेगळा विठ्ठल माझा॥१॥
कोणासी विटाळ कशाचा जाहला।
मुळींचा संचला सोंवळाची॥२॥
पांचांचा विटाळ एकाचिये अंगा।
सोंवळा तो जगामाजी कोण॥३॥
चोखा म्हणे माझा विठ्ठल सोंवळा।
अरूपे आगळा विटेवरी॥४॥

विठ्ठल हा सोवळा आणि ओवळ्याच्या वेगळा असा आहे. तो 'अरूप' आहे. मुळात 'आत्मा' हा सोवळा, पण देहाच्या संसर्गाने तो अमंगळ झालेला आहे. अशा स्थितीत पाच भूतांनी केलेला कर्दम पाच भौतिक शरीराही आहे. विटाळ आहे तो आपल्या रूपाला. त्या अर्थी 'अरूप' विठ्ठल विटेवर उभा असूनही मंगळच आहे. तो या अमंगळाचा नाश करतो. तो स्वतः अमंगळ कधीही

SEAL

Page No.
Date :

नाही, असा सुविनवाद संत चोखामेळा प्रस्तुत अभंगातून करताना आपल्याला दिसतात.

प्र. ४था "क्रांतीचा जयजयकार" हे क्रांतिगीत मराठी काव्यवाङ्मयाचे अक्षरलेणे ठरलेले आहे, या विधानाचा परामर्श घ्या?

उत्तर :- 'क्रांतीचा जयजयकार' हे कुसुमाग्रजांचे क्रांतिगीत मराठी काव्यवाङ्मयाचे अक्षरलेणे ठरले आहे. दुर्दम्य आशावाद हा या गीताचा कणा आहे.

पिचेल मनगट परी उरातिल अभंग आवेश
बलशाली मरणाहून आहे अमुचा अभिमान
मरणावरती आज आमुची पेटताच प्रेते
उठतिल त्या ज्वालांतून भावी क्रांतीचे नेते.

या प्रस्तुत कवितेतील ओळीतून स्फोटक आवाहकता, अचल ध्येयनिष्ठा, दुर्दम्य आशावाद व समर्पणाची विलक्षण ओढ अनुभवास येते.

'मृत्युच्या दारात पाऊल टाकणाऱ्या राजबंद्यांच्या ओठावरील गाणे' असे या कवितेचे दर्शनी स्वरूप असून दुर्दम्य आत्मशक्ती, अभंग आवेश आणि प्रचंड मनोबल या क्रांतीगीतातून प्रकट झाले आहे.

'गाँधीप्रणीत अहिंसक क्रांतीच्या सर्व दैवी गुणांच्या उज्ज्वल आलेख साकार करण्यासाठी मृत्युंजय श्रद्धेपूर्ण फुललेले एक अमर क्रांतिसूक्त म्हणून ही कविता मराठी वाङ्मयात अमर झाली आहे.

'कविवाणीला लागलेली प्रेषितत्वाची प्रतिष्ठा, आपल्या धगीने वाचकास उद्दीपित करणारा प्रखर आवेश, क्रांतीची दीक्षा देऊ पाहणारी, शब्दाशब्दातून ओसंडणारी आवाहक मंत्रशक्ती आणि चिरंजीव

संस्कारक्षमता बाळगून असणाऱ्या अग्निरसाची शिंपण करणाऱ्या ओळी चिरकाल प्रेरक आणि आश्वासक ठरु शकणाऱ्या आहेत. आणि म्हणूनच हे गीत केवळ गीत नसून ते क्रांतीगीत झाले आहे व मराठी काव्यवाङ्मयाचे अक्षरलेणे ठरले आहे.

'भारतमाते ! तू आपल्या डोळ्यात अश्रू का आणतेस ? अग आजच्या रात्रीचा गडद अंधःकार हा उद्याच्या उज्वल उषःकालाची नांदीच नाही का? आमची प्रेते जरी आज सरणावर पेटणार असतील तरी त्यांच्या ज्वालातून भारतमाते! तुझे भविष्य उज्वल करणारे, तुला पारतंत्र्यातून मुक्त करणारे क्रांतीवीर निर्माण होतील.

'आई! हे निश्चित समज की, तुझ्या पायांमधील परवशतेच्या शृंखला खळखळा तुटून जातील आणि तु गुलामगिरीतून मुक्त होशील.

अशाप्रकारे एका राजबंद्याच्या अंतःकरणात भारतमातेच्या स्वातंत्र्याविषयी असलेली उत्कट तळमळ शब्दा-शब्दातून प्रकट झालेली दिसते. मृत्युंजय ह्रदयातून फुललेले एक अमर क्रांतीसूक्त म्हणून ही कविता मराठी काव्यवाङ्मयात अजरामर झालेली आहे. भारतमातेच्या मुक्ततेचा दुर्दम्य आशावाद हे त्याचे महत्वपूर्ण अधिष्ठान आहे.

Dr. Govind D. Raulkar
Head Dept of Marathi

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15